**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** सोयगांव
**Year (वर्ष):** 2026
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0041
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/03/2026 03:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 07/03/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/03/2026
**Time From (वेळेपासून):** 17:08 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/03/2026 **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2026 03:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 52 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** किन्ही ,सोयगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनि केशव नाना दिंडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र विभाग,छत्रपती संभाजीनगर ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र विभाग,छत्रपती संभाजीनगर ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9004492163

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे मन्साराम बाबुराव लोखंडे | | | 1. किन्ही,सोयगाव,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |
| 2 | संतोष भगवान शेळके | | | 1. किन्ही,सोयगाव,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या भारतीय चलनाच्या 6 नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 08/03/2026

मी केशव नाना दिंडे, वय 48 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 9004492163
मी वरील प्रमाणे असुन, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे मागील 2 वर्षापासुन नेमणुकीस आहे. दि.06/03/2026 रोजी आम्ही कार्यालयीन कामकाज करीत असताना मा.पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी आमच्याकडे तक्रारदार इम्रान दगडू पठाण, वय 34 वर्ष, व्यवसाय शेती/मजुरी काम, रा. किन्ही, पो.वडगांव ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर यांना देऊन त्यांच्या तक्रारीप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे कार्यालयीन कक्षात नेऊन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. त्यांची तक्रार योग्य असल्याची खात्री केली. त्यानंतर सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यासाठी म.न.पा.छ.सं. नगर येथे लेखी पत्र देऊन दोन शासकीय पंच बोलविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांना लिहीता व वाचता येत नसल्याने त्यांचे सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार पंचासमक्ष संगणकावर टाईप करुन त्याची प्रिन्ट काढुन दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना वाचुन दाखविण्यात आली. त्यानंतर त्या तक्रारीवर तक्रारदार यांचा डाव्या हाताचा अंगठा घेण्यात आला. त्यानंतर दोन्ही पंचांनी व आम्ही वाचुन त्या तक्रारीवर सहया केल्या. ती तक्रार पुढील प्रमाणे-
मी इम्रान दगडू पठाण, वय 34 वर्ष, व्यवसाय शेती/मजुरी काम, रा.किन्ही, पो.वडगांव ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं.98227196333 मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी माझ्या जन्मापासुन रहावयास आहे. माझ्या सोबत माझी पत्नी नामे अंजुम वय 30 वर्ष, एक मुलगा व एक मुलगी हे राहतात. माझ्या राहते गावात माझी एक एकर शेती आहे. शेती व शेतमजुरी करतो.
महिला नामे सुनिता पुर्ण नाव माहीत नाही, वय अंदाजे 36 वर्ष,धंदा सफाई कामगार, रा.डाहीरी वडगांव ब्रिजजवळ, पुणे मो.नं.9112333767 हीच्या सोबत माझी मागील 6/7 महिन्यापुर्वी इंन्ट्राग्रामवर ओळख झाली. ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. त्यानंतर मी तिला पुणे येथे जाऊन 2 ते 3 वेळा भेटून आलो. त्यानंतर ती मला गरज पडल्यास फोन पे वर पैसे पाठवत होती. त्याच दरम्यान ती मला माझं कुठतरी लग्न करुन दे अस ती मला बोलत असे मी तिच्यासाठी नवरदेव शोधण्याचा खूप प्रयत्न केला. परंतू मला कांही नवरदेव मिळाला नाही. त्यानंतर तिने मला दिलेले पैसे परत मागू लागली. माझ्याकडे पैसे नसल्याने तिचे पैसे मला परत देता आले नाहीत.
त्यामुळे दि.04/03/2026 रोजी संध्याकाळी 08.30 वा.सुमारास सुनिता ही माझ्या राहते घरी आली. तिने माझ्याशी वरील पैसे परत दयावेत म्हणुन वाद घातला व मला मारहाण केली. त्यावेळी आमचा वाद पाहण्यासाठी माझ्या घरी घरचे लोक व शेजारीपाजारी, आणि आमच्या गावचे पोलीस पाटील मन्साराम बाबुराव लोखंडे, हे हजर होते. आमचे भांडण पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांनी सोडवुन त्यांचे घरी मला व सुनिताला नेले. त्या ठिकाणी आम्हा तिघांचे बोलणे, गप्पा झाल्या व रात्री तिथेच आम्ही मुक्काम केला.
दुसरे दिवशी दि.05/03/2026 रोजी सकाळी 06.00 वा.पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांनी मला व सुनिताला बनोटी येथील पोलीस चौकीत नेले. तेथे मला व सुनिताला पोलीसांनी समजावुन सांगितले. त्यानंतर सुनिताने माझ्याविरुध्द तक्रार नसल्याचा जबाब दिला. त्यानंतर मी व सुनिता पोलीस चौकीतुन बाहेर

आलो. आमचे पाठोपाठ पोलीस पाटील मन्साराम लोखंडे हे आले व मला बोलले की, तुमचा वाद मी मिटवला आहे. त्याचा मोबदला म्हणुन मला 5 हजार रुपये दयावे लागतील. माझी पैसे दयायची इच्छा नव्हती तरी मी एक/दोन दिवसात देतो असे सांगितले.

पोलीस पाटील मन्साराम लोखंडे हे मला मागणी करत असलेले 5 हजार रुपये हे लाच असल्याचे माझ्या लक्षात आल्याने व सदर लाच मला दयायची इच्छा नसल्याने त्याबाबत मी माझ्या मित्रांकडुन माहीती घेतली. व तक्रार करण्यासाठी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आलो आहे.

तरी किन्ही गावचे पोलीस पाटील मन्साराम बाबुराव लोखंडे यांना उदया दि.07/03/026 रोजी भेटण्यासाठी जाणार आहे. त्यांनी बनोटी पोलीस चौकीस नेऊन माझा व सुनिताचा वाद मिटवल्याचा मोबदला म्हणुन मागणी केलेले 5 हजार रुपये देण्याची इच्छा नाही. त्यांच्यात व माझ्यात पैश्याचा देण्या घेण्याचा, उसनवारीचा व्यवहार नाही. तरी त्यांनी माझ्याकडे वरील कामासाठी पैशाची मागणी करुन स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे.

मला मराठी व हिंदी भाषा बोलता येते, परंतू मी शाळा शिकली नसल्याने मला लिहीता वाचता येत नाही. मी माझी तक्रार मराठीत तोंडी सांगितली. त्याप्रमाणे संगणकावर टाईप करण्यात आली. त्यानंतर मला पंचासमक्ष वाचुन दाखविली ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

तक्रारदार यांच्या वरील तक्रारी प्रमाणे दि.07/03/2026 रोजी सकाळी 08.30 वा.मी, दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य असे ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर येथुन लाचमागणी व सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या सर्व साहित्यासह शासकीय चारचाकी वाहनाने निघुन 11.30 वा.सुमारास नागद मार्गे किन्ही गावाच्या जवळ सुरक्षित ठिकाणी तक्रारदार यांचेशी संपर्क करुन हजर आलो. त्या ठिकाणी तक्रारदार, सापळा पथकातील सदस्य व दोन्ही पंच यांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने माहीती देऊन, प्रक्रीया समजावुन सांगुन, सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांच्या फोनवरुन अभिकथीत लोकसेवक पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांना फोन करुन ठावठिकाणा विचारला असता त्यांनी किन्ही गावात घरी असल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार इम्रान दगडू पठाण यांनाकिन्ही गावचे पोलीस पाटील श्री. मन्साराम बाबुराव लोखंडे यांच्या लाचमागणी पडताळणी करीता व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांचे अंगावर लपवुन देण्यात आला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 मोकळे यांना लाचमागणी पडताळणीसाठी मन्साराम लोखंडे पोलीस पाटील यांचेकडे किन्ही गावात तक्रारदार यांचेकडील खाजगी मोटार सायकलने दि. 07/03/2026 रोजी दुपारी 12.53 वा.पाठविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे लाचमागणी पडताळणीहून 13.19 वा.परत आले. सदर लाचमागणी पडताळणीतील तक्रारदार यांचे पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांचेशी झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकण्यात आले. त्यात पोलीस पाटील लोखंडे हे तक्रारदार यांना गावातील शेळके यांच्या घरी बोलवितात व तक्रारदार यांच्या मिटवलेल्या भांडणाविषयी विचारपुस करतात. व मन्साराम लोखंडे हे पोलीस पाटील असल्याने भांडण मिटविणे हे त्यांचे काम असल्याचे तक्रारदार यांना सांगतात. त्यावेळी तक्रारदार यांचे सोबत पंच क्र.1 हे समक्ष हजर असल्याने पोलीस पाटील मन्साराम लोखंडे हे पंच क्र.1 यांचे बाबत विचारपुस करतात. त्यानंतर मन्साराम लोखंडे हे तक्रारदार यांना तक्रारदार यांनी सुनिता हीचे सोबत केलेले काम हे चांगले आहे का असे विचारतात त्यावेळी तक्रारदार हे चांगले नसल्याचे सांगतात. त्यावेळी तक्रारदार हे त्यांचेवरील बोझा कमी करण्याचे बोलले तर मन्साराम लोखंडे यांनी मला शासन पंधरा हजार पगार देते मला ते काम करावेच लागते. त्यावेळी तक्रारदार यांनी माझ्यावरील बोझा कमी करा अशी विनंती केली तर त्यांनी उद्या बोलतो असे सांगितले परंतू तक्रारदार यांनी जे कांही बोलायचे ते आजच बोला मी करुन देतो तुमचं आजच असे सांगितले. त्यावेळी मन्साराम यांनी करुन दे तुझ्या हिसोबाने काय दयायचे ते दे असे बोलतो त्यावेळी तक्रारदार यांनी पुन्हा किती दयायचे याबाबत विचारले असता त्यांनी दोन तीन घंटयात सांगतो तुला, असे बोलुन दोन तासानंतर लाचेच्या रकमेबाबत सांगणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यामुळे तक्रारदार, दोन्ही पंच, आम्ही व पथकातील सदस्य असे सुरक्षित ठिकाणी थांबुन प्रतिक्षा केली. त्यानंतर तक्रारदार यांनी पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांना फोन केला परंतू त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. म्हणुन तक्रारदार यांना परत व्हाईस रेकॉर्डर चालू करुन पंच क्र.1 यांना सोबत देऊन किन्ही गावात पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांचे भेटीसाठी दि.07/03/2026 रोजी 16.20 वा.तक्रारदार यांच्या मोटार सायकवर पाठविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे 16.33 वा.परत आले.त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन ताब्यात घेतला व त्यातील लाचमागणी पडताळणीत झालेले तक्रारदार व पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांचे संभाषण आम्ही सर्वांनी ऐकले त्यात तक्रारदार यांनी मी थोडया वेळाने बाहेर गावी जाणार आहे असे सांगितले तर मन्साराम लोखंडे यांनी कस करतो असे विचारले तर तक्रारदार यांनी तुम्हाला किती लागणार आहेत

असे विचारले त्यावेळी मन्साराम यांनी पाच असे बोलले. त्यावेळी तुम्ही बोला, तुमचे किती हाय..किती बोलले, त्यावेळी पाच बोललो आहे. तू किती देणार हाईस, त्यावेळी तक्रारदार यांनी जास्त बोजा होतो असे सांगितले तर मन्साराम लोखंडे यांनी पाचशे, दोनशे कांहीतरी बोलना..त्यावेळी तक्रारदार यांनी पाच हजार रुपयांचा लोड टाकल्याचे बोलले त्यावेळी मन्साराम यांनी तीन हजार देऊन टाक असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी तीन हजर देऊ का असे बोलले तर मन्साराम यांनी ठिक हाय चालेले असे सांगुन किती वेळात पैसे आणुन देतो असे मन्साराम यांनी विचारले तर तक्रारदार यांनी अर्धा एक तासात देतो असे सांगत असताना मन्साराम यांनी ते पैसे त्यांचे जवळील संतोष (आरोपी क्र.2) यांचेकडे कोणाला सोबत न घेऊन जाता एकट्याने आणुन दे असे तक्रारदार यांना बोलुन तात्काळ लाचेची रक्कम तात्काळ आणुन वरील लाच मागणी करतेवेळी समक्ष हजर असलेले इसम श्री. संतोष यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर सापळापुर्व पंचनामा व सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच,सापळा पथकातील सदस्यांना माहीती देऊन, मार्गदर्शन करुन, प्रात्यक्षिक करुन दाखविले व सुचना दिल्या. त्यानंतरतक्रारदार यांना लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी 500/- रुपये दराच्या भारतीय चलनाच्या 6 नोटा एकुण 3,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे वर्णन व नंबर एक कागदावर लिहुन घेण्यात आले. तो कागद पंच क्र.2 यांचेकडे देण्यात आला. त्यानंतर सदर नोटांना अॅन्थ्रॉसीन पावडर लावुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडे देण्यात आली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर दि.07/03/2026 रोजी 16.59 वा.चालू करुन तक्रारदार यांचे अंगावर लपवुन दिला. तक्रारदार यांचे सोबत पंच क्र.1 यांना देऊन तक्रारदार यांचेकडील मो. सा.ने लाचेची रक्कम देण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही व पंच क्र.2 व सापळा पथकातील सदस्य असे शासकीय वाहन व खाजगी मोटार सायकलने किन्ही गावात गेलोत. तेथे तक्रारदार व पंच क्र.1 हे एका चहाच्या उघडया (बिगर दरवाज्याच्या ) हॉटेलमध्ये गेले. त्यांच्या आजुबाजुला दबा धरुन आम्ही थांबलोत. तक्रारदार व पंच क्र.1 यांची एका इसमासोबत भेट झाली. त्यावेळी त्यांचेत चर्चा झाली त्यानंतर तक्रारदार यांचा लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ठरलेला इशारा म्हणुन त्यांनी त्यांचे डोक्यास गुंडाळलेला गमचा (रुमाल) डोक्यावरुन काढुन गळ्यात घेतला. ती वेळ 17.08 वाजेची होती. त्यावेळी आम्ही, पंच क्र.2 व सापळा पथकातील सदस्य तात्काळ घटनास्थळी हजर आलो. त्या ठिकाणी पंच क्र.1 व तक्रारदार यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली या बाबत विचारणा करुन समक्ष हजर असलेले इसम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याचे तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितले. त्यावेळी आम्ही सदर इसमास आमचा परिचय करुन दिला. त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव- श्री. संतोष भगवान शेळके, वय 43 वर्ष, रा. किन्ही ता.सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर
टिप- संगणक सिसीटिएनएस प्रणालीत अक्षरांची क्षमता ही आठ हजार शब्दाची असल्याने फिर्यादीतील पुढील मजकुर स्वतंत्र पाणावर जोडण्यात आला आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

PANKAJ DEVISING BARWAL(I (Inspector)) / API **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

***to take up the Investigation*** **(ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.सोयगांव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** PANKAJ DEVISING B/
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API

असे सांगुन लाचेची रक्कम ही पोलीस पाटील मन्साराम बाबुराव लोखंडे याची असल्याचे सांगितले. त्यामुळे दोन्ही पंचासमक्ष पोलीस पाटील मन्साराम लोखंडे यांना संतोष शेळके यांचे फोनवरुन फोन केला. परंतू त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर पंच क्र.2 यांचे करवी संतोष शेळके यांचेकडुन लाचेची रक्कम 3,000/- रुपये अॅन्थ्रॉसीन पावडर लागलेली हस्तगत करण्यात येऊन, पुढील प्रक्रीया करण्यात आली. त्यानंतर पोलीस पाटील मन्साराम बाबुराव लोखंडे यांचा गावात शोध घेण्यात आला. परंतू ते मिळुन आले नाहीत. त्यानंतर घटनास्थळाची कार्यवाही करुन, पो.स्टे.सोयगांव येथे येऊन पुढील कार्यवाही पुर्ण करण्यात आली.

तरी आरोपी लोकसेवक श्री. मन्साराम बाबुराव लोखंडे, पोलीस पाटील किन्ही ता.सोयगांव यांनी तक्रारदार यांना त्यांचे सुनिता हिचे सोबत दि.04/03/2026 रोजीच्या झालेले भांडणमिटविले व दि.05/03/2026 रोजी पोलीसांत गुन्हा दाखल होऊ दिला नाही. याचा मोबदला म्हणुन दि.07/03/2026 रोजी 5,000/- रुपये लाचेची मागणी किन्ही गावातील अशोक नारायण भोई यांचे चहा पाण्याचे हॉटेलमध्ये पंच क्र.1 व आरोपी क्र.2 यांचेसमक्ष करुन, तडजोडीअंती 3,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. व लाचेची रक्कम आरोपी क्र.2 श्री संतोष भगवान शेळके यांचेकडे देण्यास सांगितली. म्हणुन कलम- 7 भ्र.प्र.अधि.1988 प्रमाणे अपराध केला.

आरोपी क्र.2 श्री. संतोष भगवान शेळके, वय 43 वर्ष, रा. किन्ही यांनी आरोपी क्र.1 यांचे सांगण्यावरुन तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम दि.07/03/2026 रोजी 17.08 वा.किन्ही गावातील अशोक नारायण भोई यांचे चहा पाण्याचे हॉटेलमध्ये स्विकारुन आरोपी क्र.1 यांच्या लाचमागणीस प्रोत्साहन दिले. म्हणुन कलम- 12 भ्र.प्र.अधि.1988 प्रमाणे त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली सही.

पोलीस ठाणे सोयगांव
ता.सोयगांव जि.औरंगाबाद
सत्यमेव जयते

HC/1073

**पोलीस ठाणे अंमलदार**
**पो.स्टे.सोयगांव**